सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९९ | मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## नंदगाव घरकुल घोटाळा!

# सरपंचांनी लाभार्थ्यांकडून पैसे उकळल्याचा ग्रामस्थांचा आरोप!

### अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष; सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील नंदगाव येथील लोकनियुक्त सरपंच घरकुल लाभार्थ्यांकडून पैसे घेत आहेत. याबाबत गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही अद्याप कारवाई झालेली नाही, असा आरोप पृथ्वीराज पाटील यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी केला आहे.

पृथ्वीराज पाटील यांनी गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांच्याकडे ५ ऑगस्ट २०२५ रोजी लेखी तक्रार देऊन घरकुल घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी केली होती. या तक्रारीनुसार नंदगावचे लोकनियुक्त सरपंच घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकडून प्रत्येकी रुपये ५ हजार ते २० हजार रुपये दोन टप्प्यांत गोळा करत असल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकारामुळे



गरजू, बेघर व गरीब कुटुंबांना हेतुपुरस्सर डावलले जात असल्याचा आरोप आहे. ज्यांच्याकडे आधीपासून मोठी व पक्की घरे आहेत अशा सुमारे १५ ते २० अपात्र लाभार्थ्यांना नियम धाब्यावर बसवून घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे. याशिवाय, काही लाभार्थ्यांना शासनाकडून मिळणारी सुमारे ८५ हजार रुपयांची मदत प्रत्यक्षात दिली जात नसल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. विशेष म्हणजे, सुमारे १०० घरकुलांच्या नावावर प्रत्येकी ५ हजार रुपये जमा करूनही आजपर्यंत अनेक घरकुले प्रत्यक्षात बांधण्यात आलेली नाहीत. त्यामुळे शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याच्या आरोप होत आहे. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करावी. दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

> घरकुल घोटाळ्याबाबत सरपंचांनी लाभार्थ्यांकडून पैसे उकळले आहेत. यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांकडे ऑगस्ट महिन्यापासून तक्रार दिली आहे. यास तब्बल पाच महिने झाले आहेत. आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडे देखील तक्रार दिली होती. त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना संपर्क साधला होता. गटविकास अधिकाऱ्यांनी गावात दोन वेळा येऊन जाब घेतला आहे. यावेळी सरपंचांनी आमच्याकडून पैसे घेतल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले आहे. मात्र, अद्यापही ठोस कारवाई झालेली नाही.
> – **पृथ्वीराज पाटील,** ग्रामस्थ, नंदगाव.

> सरपंच हे शासकीय कर्मचारी नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरोधात गैरव्यवहाराच्या तक्रारी असल्यास त्या अँटी करप्शन (लाचलुचपत प्रतिबंधक) विभागाच्या अख्यारीत येतात. सरपंचांनी किंवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने पैसे घेतल्याचे तक्रारी असतील, तर संबंधित माहिती अँटी करप्शन विभागास देऊन त्यांना रंगेहाथ पकडून कायदेशीर कारवाई करावी.
> – **एन. आर. पाटील, गटविकास अधिकारी,** पंचायत समिती, अमळनेर.

> ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याच्या आरोपावरून गटविकास अधिकाऱ्यांनीही गावाला भेट दिली. त्यांनी या संदर्भात सविस्तर माहिती घेतली आहे. माझ्यावरील आरोप बिनबुडाचे आहेत. मी पैसे घेतले असतील, तर माझ्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करावा. संबंधिताकडून निव्वळ माझ्याविरुद्ध कटकारस्थान सुरू आहे.
> – **दामोदर खैरनार,** सरपंच, नंदगाव.

## अमळगाव येथील प्रौढाची गळफास घेऊन आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील अमळगाव येथील दिलीप अभिमान भील (वय ५०) यांनी पिंपळी रस्त्यालगत बाभळीच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवार, दि. २८ रोजी सकाळी ७ वाजता निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच त्यांच्या नातेवाईकांनी व काही ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामीण रुग्णालयात दाखल करून शव विच्छेन करण्यात आले. शरद भील यांनी दिलेल्या माहितीवरून मारवड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. हवालदार संजय पाटील तपास करीत आहेत. आत्महत्येचे नेमके कारण कळू शकले नाही.

## अमळनेर– पारोळामार्गे पुणे बस अचानक बंद

### आगार प्रमुखांनी लक्ष देण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या तीन ते चार वर्षांपासून नियमितपणे सुरू असलेली अमळनेर– पारोळामार्गे असलेली पुणे अचानक बंद झाली आहे. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. ही बस सेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. याबाबत आगार प्रमुखांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

साधारणपणे गेल्या १५ ते २० दिवसांपासून ही बस सेवा बंद आहे. रोज प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अमळनेरहून पारोळा, कजगाव, चाळीसगाव, संभाजीनगर मार्गे पुणे येथे जाणारी ही बस दररोज सकाळी ७ : १५ वाजता अमळनेर बसस्थानकावरून सुटत होती. मात्र, अनेक प्रवासी पहाटेपासून तयारी करून बसस्थानकात येतात. मात्र, बस उपलब्ध नसल्याने निराश होऊन परत फिरावे लागत आहे. तसेच पुण्याला जाण्यासाठी दुसी बस कधी आहे ? याबाबतही अनेकांना माहीत नाही. त्यामुळे प्रवाशांचा वेळ, श्रम आणि आर्थिक नुकसान होत आहे. या संदर्भात प्रवाशांनी बसस्थानकातील कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता संबंधित मार्गावरील रस्ता खराब आहे. सध्या रस्त्याचे काम सुरू असल्याचे कारण सांगण्यात येत आहे. मात्र, या मार्गावर जाण्यास काही चालक व वाहक टाळाटाळ करत असल्यानेच बस सेवा बंद असल्याची चर्चा आहे.

> अमळनेर– पारोळा मार्गे पुण्याला जाणारी बस बंद करण्यात आली आहे. ही बस लांब पल्ल्याची असल्याने उत्पन्नात घट होत होती. त्यामुळे सदर बस सेवा वरूनच बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शालेय सत्र सुरू असल्यामुळे संबंधित आगारांना नव्या बस गाड्या देण्यात आल्या आहेत. पुणे येथे जाण्यासाठी प्रवाशांसाठी सकाळी ५ : ४० वाजता नगरमार्गे तसेच ६ : १५ वाजता संगमनेरमार्गे बस उपलब्ध आहेत.
> – पी. बी. चौधरी, आगार प्रमुख, अमळनेर.

## थंड वाऱ्यांमुळे राज्यात थंडीचा प्रभाव कायम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात थंडीचा कडाका जाणवत आहे. किमान तापमानामध्ये मोठे चढ– उतार पाहायला मिळत आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यात आगामी काही दिवस हीच स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे थंडीचा प्रभाव टिकून आहे. काही जिल्ह्यांमध्ये पारा १० अंश सेल्सिअसच्या खाली आल्याने नागरिकांना हुडहुडी भरली आहे.उत्तर भारताचा विचार करता तेथे कडाक्याच्या थंडीसह धुक्याची चादर पसरलेली दिसत आहे. उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाणा आणि मध्य प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये थंडीची लाट तीव्र आहे. मध्य प्रदेशातील राजगड येथे देशातील सर्वात कमी ४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, तर दुसरीकडे केरळमधील कोटायम येथे ३५. ५ अंश सेल्सिअस इतके उच्चांकी तापमान नोंदविले गेले आहे. देशाच्या विविध भागांतील हवामानातील हे टोकाचे बदल प्रकर्षाने जाणवत आहेत. महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यातील निफाड येथील गहू संशोधन केंद्रात ७. ९ अंश सेल्सिअस इतक्या नीचांकी तापमानाची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ मोहोळमध्ये ८. ४ अंश आणि जेऊरमध्ये ८. ५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले. तसेच अहिल्यानगर, मालेगाव, नाशिक शहर आणि गोंदिया या भागांतही तापमान १० अंशांच्या खाली गेल्याने रात्री आणि पहाटेच्या वेळी थंडीचा जोर अधिक आहे. किमान तापमानातील या चढ– उतारामुळे थंडी कधी कमी तर कधी जास्त प्रमाणात जाणवत आहे.

## दहिवद ग्रामपंचायतीच्या वृक्षलागवडीची शास्त्रज्ञांकडून पाहणी

### रोजगार हमी योजनेंतर्गत राबविलेल्या 'बिहार पॅटर्न'चे केले कौतुक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील दहिवद येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजना (बिहार पॅटर्न) अंतर्गत ग्रामपंचायतीने वृक्षलागवड केली आहे. या वृक्षलागवडीची पाहणी नामवंत शास्त्रज्ञ व तज्ज्ञांनी नुकतीच केली आहे. या कामाचे त्यांनी कोडकौतुक केले आहे.

किमया अग्रो कंपनी प्रा. लि. (पुणे) यांच्या जळगाव येथील कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त दि. २७ डिसेंबर रोजी शास्त्रज्ञ डॉ. विजया पाटील (मा. इंटरनॅशनल रिसर्च हेड हिंदुस्तान लिव्हर कंपनी), किमया अग्रोचे मॅनेजिंग डायरेक्टर, सॉफ्टवेअर इंजिनिअर मिलिंद बारगजे यांनी इंजिनिअर सौ. संगीता दिनेश पाटील यांच्या मार्फत दहिहवद पंचक्रोशीस भेट दिली. महिला मजुरांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी तिरखी मारोती मंदिर परिसरातील वृक्षलागवडीची



*दहिवद (ता. अमळनेर) : वृक्षलागवडीची पाहणी करताना डॉ. विजया पाटील (मा. इंटरनॅशनल रिसर्च हेड हिंदुस्तान लिव्हर कंपनी), किमया अग्रोचे मॅनेजिंग डायरेक्टर, सॉफ्टवेअर इंजिनिअर मिलिंद बारगजे व इंजिनिअर सौ. संगीता दिनेश पाटील आदी.*

त्यांनी पाहणी केली. त्यानंतर रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांची पाहणी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात प्रशासक श्री. कठले व ग्रामविकास अधिकारी शेखर धनगर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर जिल्हा परिषद मराठी शाळेस भेट देऊन तेथील विकासकामांची पाहणी केली. बचतगट सभागृह, सोनखेडी येथील दीपक पाटील यांच्या शेतातील डाळिंब पिकाची पाहणी, तसेच आश्रम शाळेजवळील मियावाकी वृक्षलागवड व बिहार पॅटर्न अंतर्गत लावलेल्या वृक्षांची पाहणी त्यांनी केली. या संपूर्ण वृक्षलागवडीसाठी आवश्यक ऑरगॅनिक खत पुरवण्याची जबाबदारी किमया अग्रो कंपनीने स्वीकारली. डॉ. विजया पाटील यांनी महिला बचत गटांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी जांभूळ, महुआ कँडीसारख्या मूल्यवर्धित उत्पादनांचे प्रशिक्षण व बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. अमळनेर तालुक्यात ऊस व आल्याचे रेसिड्यू-फ्री उत्पादन करून त्यापासून ऑर्गॅनिक गूळ पावडर व आले पावडर तयार करून एक्सपोर्ट प्रकल्प उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यामुळे लवकरच परिसरातील शेतकऱ्यांचा माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी दिनेश पाटील (माजी सदस्य, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली), सुभाष देसले (माजी सभापती, पं. स. अमळनेर), प्रवीण माळी (उपसरपंच), ईश्वर माळी (चेअरमन, विकास सोसायटी), गोकुळ माळी, शिवाजी पारधी, रवींद्र शेलकर, भागवत सोनवणे यांच्यासह महिला- पुरुष मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# पाकिस्तानच्या ‘बकासूरा’ला मोठा धक्का

## कबड्डी संघाचा मोठा निर्णय; तिरंगा फडकवत भारतासाठी खेळणे महागात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष नवीन नाही. दोन देशांतील लढतीच्या वेळी कमालीचा तणाव असतो. मात्र आता पाकिस्तानचा कबड्डीपटू बहारिनमधील खासगी स्पर्धेत भारतीय संघातून खेळल्याचे समोर आले आहे. एवढेच नव्हे, तर पाकिस्तान कबड्डी महासंघाकडून ना हरकत प्रमाणपत्र न घेता खेळल्याबद्दल पाकिस्तान महासंघाने त्याच्यावर कायमची बंदी घातली आहे.

उबेदुल्ला राजपूत असे या कबड्डीपटूचे नाव आहे. त्याची पाकिस्तानच्या अव्वल कबड्डीपटूंत गणना होते. तो भारतीय संघातून खेळला. शिवाय त्याने तिरंगाही फडकावला असल्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवरून प्रसारित झाली. पाक कबड्डी महासंघाच्या कार्यकारिणीची रविवार, दि. २८ डिसेंबर रोजी तातडीने बैठक झाली. त्यात उबेदुल्लावर कायमची बंदी घालण्याचा निर्णय झाला. मात्र काही वेळातच उबेदुल्लाला या बंदीविरुद्ध शिस्तपालन समितीकडे न्याय मागता येईल, असे पाक कबड्डी महासंघाचे सचिव राणा सरवर यांनी सांगितले.



### नेमके झाले काय?

बहारिनमधील साल्माबाद येथे १६ डिसेंबरला जीसीसी कप ही कबड्डी स्पर्धा झाली. गल्फ एअर क्लबवर झालेल्या या स्पर्धेतील व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यामुळे एकच गदारोळ झाला. ही स्पर्धा कोणत्याही संघटनेने आयोजित केली नव्हती. मात्र ती आंतरराष्ट्रीय स्पर्धा असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले. जीसीसी कप स्पर्धा संयोजकांनी या स्पर्धेतील संघांना भारत, पाकिस्तान, कॅनडा आणि इराण अशी नावे दिली होती. त्या स्पर्धेसाठी खेळाडूंना निमंत्रित केले होते. प्रामुख्याने संघांची निवड करताना संबंधित देशातील खेळाडूंना स्थान दिले होते. त्यामुळे भारत संघात प्रामुख्याने भारतातील खेळाडूंचा समावेश होता, असा दावा राणा यांनी केल्याचे वृत्त ‘ डॉन ’ या पाकिस्तानातील माध्यमाने दिले आहे. बहारिनमधील या स्पर्धेसाठी पाकिस्तानमधील एकूण १६ खेळाडू निमंत्रित होते. मात्र यातील एकाही खेळाडूने या स्पर्धेत खेळण्यासाठी आमच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतले नव्हते. त्यानंतर ते या स्पर्धेत पाकिस्तान संघातून खेळले, असा दावा राणा यांनी केला. पाक महासंघाचे अध्यक्ष चौधरी शाफाय हुसेन यांनी या संदर्भात चौकशीचे आदेश दिले आहेत.

### राष्ट्रीय ध्वज अमान्य

व्यावसायिक स्पर्धात अनेक देशांतील खेळाडू एकत्रितपणे खेळतात. मात्र संबंधित संघाला देशाचे नाव देणे, तसेच त्यांचा राष्ट्रीय ध्वज वापरणे चुकीचे आहे, असेही पाकिस्तान महासंघाने म्हटले आहे.

### भारताकडून खेळल्याचे माहितीच नव्हते

बहारिनमधील स्पर्धेत आपण खेळायला गेलो त्यावेळी माझा एका संघात समावेश करण्यात आला. त्या संघास ‘ भारत ’ असे संबोधले जात असल्याचे आपणास माहिती नव्हते, असा दावा उबेदुल्लाने केला. बहारिनमध्ये स्थानिक स्पर्धा होती. ती अधिकृतपणे भारत-पाकिस्तान लढत नव्हती. सामना सुरू झाल्यावर काही वेळात चाहत्यांनी घोषणा सुरू केल्या त्यावेळी आपणास या लढतीस भारत-पाकिस्तान सामन्याचे स्वरूप देण्यात आल्याचे कळाले. आपण समालोचकांना हा सामना क्लब संघातील आहे, असे सांगण्याची विनंतीही केली होती. जर हा सामना भारत-पाकिस्तान सांगितला जाणार आहे, हे आपल्याला माहिती असते, तर आपण त्यात खेळलोही नसतो, असा दावा उबेदुल्लाने केला. त्याचबरोबर आपल्यामुळे ज्यांच्या भावना दुखावल्या असतील त्यांनी माफी मागतो, असेही त्याने सांगितले.

# महिलांना पुरुषांपेक्षा ‘ एसी ’मध्ये जास्त थंडी का वाटते?

## जाणून घ्या यामागील वैज्ञानिक कारणे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



घरात किंवा ऑफिसमध्ये ‘ एसी ’चे तापमान ठरविताना तुम्ही अनेकदा पाहिले असेल, की पुरुष तापमान कमी करण्याचा आग्रह धरतात, तर महिला तापमान वाढविण्याची मागणी करतात. महिलांना पुरुषांपेक्षा जास्त थंडी का वाटते? यामागील वैज्ञानिक कारणे काय आहेत? संशोधनातून याबाबत काही रंजक निष्कर्ष समोर आले आहेत.

### चयापचय दरातील फरक

‘ नेचर ’ आणि ‘ सायन्स डायरेक्ट ’ या प्रख्यात विज्ञान नियतकालिकांमध्ये प्रकाशित अभ्यासानुसार महिलांचा चयापचय दर (मेटाबॉलिक रेट) पुरुषांपेक्षा साधारणपणे कमी असतो. यामुळे महिलांच्या शरीराची उष्णता निर्माण करण्याची क्षमता कमी होते, विशेषतः थंड वातावरणात. परिणामी कमी तापमानात महिलांना जास्त थंडी वाटते, तर पुरुषांना त्याच तापमानात आरामदायी वाटते.

### आरामदायी तापमानाचा फरक


‘ नेचर ’च्या एका अभ्यासानुसार पुरुषांना २२-२३ अंश सेल्सिअस तापमान आरामदायी वाटते, तर महिलांना त्यापेक्षा २.५ अंश जास्त, म्हणजेच २४-२५ अंश सेल्सिअस तापमानात आराम मिळतो. यामागील कारण आहे शरीरातील उष्णता निर्मितीतील फरक. पुरुषांचा चयापचय दर जास्त असल्याने त्यांचे शरीर अधिक उष्णता निर्माण करते. ज्यामुळे त्यांना कमी तापमानातही थंडी कमी जाणवते.

### तज्ज्ञांचे मत

इंग्लंडमधील वॉरविक मेडिकल स्कूलचे प्राध्यापक पॉल थॉर्नले यांच्या मते, पुरुष आणि महिलांमधील चयापचय दर आणि शरीरातील उष्णता निर्मितीच्या क्षमतेतील फरकामुळे त्यांना आरामदायी वाटणारे तापमान वेगवेगळे असते. यामुळे ऑफिस किंवा घरात एसीचे तापमान ठरविताना मतभेद होतात.

### इतर कारणे

संशोधनात असेही दिसून आले आहे, की महिलांच्या शरीरातील स्नायूंचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी असते. जे उष्णता निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच हार्मोन्समधील फरक आणि शरीरातील चरबीचे प्रमाण यांचाही यावर परिणाम होतो. या सर्व कारणांमुळे महिलांना थंड वातावरणात जास्त अस्वस्थता जाणवते. महिलांना पुरुषांपेक्षा एसीमध्ये जास्त थंडी वाटण्यामागे केवळ भावना नसून, वैज्ञानिक कारणे आहेत. चयापचय दर, शरीरातील उष्णता निर्मिती आणि शारीरिक रचना यांमधील फरक याला कारणीभूत आहे. पुढच्या वेळी एसीचे तापमान ठरवताना या वैज्ञानिक कारणांचा विचार करा. सर्वांना आरामदायी वातावरण मिळेल याची काळजी घ्या.




**सिद्धार्थ जाधव ‘ कॉमेडीचा राजा ’**

एका मुलाखतीत त्याला विचारले, की [illegible]र्थ, तू इतका जोशात कसा राहतोस? तो म्हणाला, की मी रोज सकाळी दोन जोक्स खातो. आणि खरोखर त्याच्या बोलण्यातच ऊर्जा असते.



**प्रिया बापट ‘ सेटवरील हशा ’**

‘ टाईमपास ’च्या शूटिंगदरम्यान दिग्दर्शक म्हणाले, की सीनमध्ये रडायचे आहे. ती म्हणाली, की पण साई ताम्हणकर मला पाहूनच हसवते.त्यामुळे तो सीन तीन वेळा फेल झाला. कारण दोघींनाही हसू आवरत नव्हते.



**साई ताम्हणकर ‘ रेस्टॉरंटमधला किस्सा ’**

एकदा रेस्टॉरंटमध्ये फॅन म्हणाला, की मॅडम, तुम्हाला पाहून मी ‘ सॉलिड ’ झालोय. ती हसून म्हणाली, की मग ऑर्डर देताना लिक्विड राहा.

# ‘ बीसीसीआय ’ कसोटीसाठी नेमणार नवा प्रशिक्षक?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


वन-डे व टी-२० क्रिकेट संघाचा प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीरची कामगिरी प्रभावी राहिली. त्याने दोन्ही फॉरमॅटमध्ये प्रत्येकी एक आयसीसी आणि एसीसी ट्रॉफी जिंकली. मात्र याचवेळी कसोटी क्रिकेटमध्ये सेना (दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया) देशांविरुद्ध १० पराभव पत्करावे लागल्याने त्याची कसोटीतील कामगिरी समाधानकारक राहिलेली नाही. याच पार्श्वभूमीवर बीसीसीआय कसोटी क्रिकेटसाठी नव्या प्रशिक्षकपदाच्या शोधात असल्याचे वृत्त आहे.

प्राप्त माहितीनुसार गेल्या महिन्यात मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २ कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताने नामुष्कीजनक पराभव पत्करल्यानंतर क्रिकेट बोर्डातील एका महत्त्वपूर्ण व्यक्तीने व्ही.व्ही.एस.लक्ष्मणकडे पुन्हा एकदा संपर्क साधला आणि गंभीरच्या जागी कसोटी संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारण्यास लक्ष्मण इच्छुक आहे का, याची चाचपणी करण्यात आली होती. परंतु लक्ष्मण यासाठी फारसा उत्सुक नसल्याचे कळते.

गौतम गंभीरचा बीसीसीआयसोबतचा करार २०२७ च्या वन-डे विश्वचषकापर्यंत असला, तरी पुढील ५ आठवड्यांत सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकातील भारताच्या कामगिरीवर त्यांचा करार अवलंबून असेल. आवश्यकता भासल्यास या करारावर फेरविचार होण्याची शक्यता आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे. बीसीसीआयच्या वर्तुळात गंभीर २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या उर्वरित ९ कसोटी सामन्यांसाठी कसोटी संघाचा प्रशिक्षक म्हणून योग्य आहे की नाही यावर अद्याप एकमत झालेले नाही.

### दोन महिने गंभीरसाठी महत्त्वाचे!

लक्ष्मणला वरिष्ठ कसोटी संघाचे प्रशिक्षण घेण्यात रस नसल्याने गंभीरला पर्याय उपलब्ध नाहीत, हा त्याचा सर्वांत मोठा फायदा आहे, असेही सूत्रांनी नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर बीसीसीआयमध्ये पाठिंबा मिळत असला, तरी आगामी विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर पुढील दोन महिने गंभीरसाठी अतिशय महत्त्वाचे असणार आहेत, हे स्पष्ट आहे.



# फ्रिज के ऊपर क्या नहीं रखना चाहिए?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्म में वास्तु शास्त्र का काफी महत्व होता है। घर की ऊर्जा को सकारात्मक और संतुलित बनाए रखने के लिए वास्तु शास्त्र के नियमों का पालन करना जरूरी होता है। ऐसे में घर में रखी चीजें वास्तु के अनुसार होनी चाहिए। ऐसे में आज हम आपको फ्रिज से जुड़े वास्तु नियम बताएंगे।



**जानिए वास्तु से जुड़े नियम**

### मॉर्डन समय में डिमांड

फ्रिज, जो कि मॉर्डन समय में हर घर की जरूरत बन गया है। इसमें खाने-पीने की कई चीजें रखी जाती हैं। लेकिन कई बार लोग फ्रिज के ऊपर भी कई तरह की चीजें रख देते हैं। ऐसे में सवाल उठता है कि आखिर फ्रिज के ऊपर सामान रखना शुभ होता है या अशुभ। चलिए जानते हैं।

### फ्रिज के ऊपर क्या ना रखें

वास्तु शास्त्र के मुताबिक फ्रिज के ऊपर कई तरह की चीजें रखना अशुभ माना जाता है। फ्रिज के ऊपर रखी गई कुछ चीजों से नकारात्मकता तेजी से बढ़ती है जोकि वास्तु दोष का कारण बन सकती है। चलिए अब जानते हैं कि फ्रिज के ऊपर क्या नहीं रखना चाहिए।

### जल तत्व वाली चीजें ना रखें

वास्तु शास्त्र के मुताबिक फ्रिज अग्नि तत्व का प्रतीक है। ऐसे में इसके ऊपर जल तत्व से जुड़ी चीजें नहीं रखना चाहिए। मान्यता है कि फ्रिज के ऊपर जल तत्व से जुड़ी चीजें जैसे फिश एक्वेरियम, मनी प्लांट जैसी चीजें रखने से आर्थिक नुकसान, कलह-क्लेश, पारिवारिक तनाव जैसी स्थिति पैदा हो सकती है।

### दवाइयां ना रखें

वास्तु के अनुसार फ्रिज के ऊपरी सतह पर दवाइयां नहीं रखनी चाहिए। इससे सेहत संबंधी समस्याएं तेजी से बढ़ती हैं। साथ ही ऐसी कई दवाएं भी होती हैं, जिन्हें गर्म वातावरण में रखने से बचना चाहिए। फ्रिज की ऊपरी सतह गर्म होती है, जिससे कि दवाइयां खराब हो सकती है।

### कबाड़ के सामान

कई घरों में छोटी-बड़ी बेकार चीजों को लोग सीधे फ्रिज के ऊपर रख देते हैं। मान्यता है कि पुराने, खराब या बेकार पड़े सामान को फ्रिज के ऊपर रखने से नकारात्मक ऊर्जा तेजी से बढ़ती है और घर की सुख-समृद्धि में बाधा उत्पन्न हो सकती है।

### ये भी ना रखें

इसके साथ ही फ्रिज के ऊपर भगवान की मूर्ति या तस्वीर, बांस का पौधा, रुपये-पैसे, भारी सामान, ओवन, मोबाइल चार्जर, अनाज के डिब्बे, ट्रॉफी, अवाड्र्स जैसी चीजों को भी नहीं रखना चाहिए।

### क्या करें

मान्यता है कि घर पर शांति और सकारात्मकता बनाए रखने के लिए आप फ्रिज के ऊपर सजावट के लिए हल्के सामान का ही इस्तेमाल करें।

**सक्सेस स्टोरी**

# पंधरा लाखांची नोकरी सोडली, शेतीची वाट धरली!

## करताहेत वार्षिक पंधरा कोटी रुपयांची उलाढाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्याच्या घडीला अनेक जण शेतीमध्ये आपले भविष्य आजमावत आहेत. त्यात अनेक इंजिनिअर्स किंवा सुशिक्षित व्यक्तींचा देखील समावेश आहे. विशेष म्हणजे आपल्या ज्ञान आणि शिक्षणाच्या जोरावर या सुशिक्षितांना शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात यश देखील मिळत आहे. आज आपण अशाच एका इंजिनिअर असलेल्या व्यक्तीची यशोगाथा पाहणार आहोत. ज्याने आपली १५ लाख रुपये वार्षिक पॅकेज असलेली नोकरी सोडून, शेतीची वाट धरली. याच शेतीच्या माध्यमातून हा सुशिक्षित शेतकरी सध्या तब्बल दीड कोटी रुपयांपेक्षा अधिकची वार्षिक उलाढाल करत आहे.



### वडील आणि मुलाला कर्करोगामुळे गमावले

राहुल कुमार असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील खजरी गावातील रहिवासी आहेत. त्यांनी सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून शेतीमध्ये नवीन क्रांती घडविली आहे. बी.टेक. आणि एमबीएचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर राहुलने सुमारे १५ वर्षे एका पॉवर प्लांटमध्ये काम केले. परंतु त्यांनी आपल्या वडील आणि मुलाला कर्करोगासारख्या गंभीर आजाराने गमावले. त्याचवेळी त्यांनी २०१८ मध्ये नोकरी सोडून सेंद्रिय शेती करण्याचा निर्णय घेतला.

नैसर्गिक शेती समजून घेऊन ती प्रभावीपणे अंगीकारण्यासाठी राहुल यांनी राज्य सरकारच्या मदतीने देशातील विविध संस्था आणि शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन घेतले. ते जीवामृत, गांडूळखत आणि नीमस्त्रासारखी सेंद्रिय उत्पादने तयार करायला शिकले आणि इस्रायली तंत्रज्ञानाचा वापर करून संरक्षित शेती आणि मशरूम उत्पादनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब केला.

### कोणत्या पिकांचे उत्पादन घेतात

राहुल यांच्याकडे १० एकर जमीन आहे. त्यामध्ये त्यांनी गहू, ज्वारी, बाजरी, नाचणी, हरभरा, मूग आणि भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले आहे. नैसर्गिक खते आणि सेंद्रिय पद्धती वापरून त्यांनी आपल्या उत्पादनाचा दर्जा सुधारला आहे. याशिवाय ते दूध आणि मशरूमचे उत्पादनही घेत आहेत. ज्वारी, बाजरी, नाचणी, मूग, काळा गहू आणि इतर धान्यांचा समावेश असलेल्या “रसायनमुक्त नवरत्न पीठ” हे राहुलचे आतापर्यंतचे सर्वात मोठे यश आहे. हे पीठ त्यांच्या सेंद्रिय प्रक्रिया युनिटमध्ये तयार केले जाते. जे ग्राहकांमध्ये अधिक लोकप्रिय होत आहे. या युनिटने परिसरातील ५० हून अधिक गरजूंना रोजगारही उपलब्ध करून दिला आहे.

### किती होत आहे वार्षिक उलाढाल?

राहुल कंपनीत १५ लाखांच्या पॅकेजवर काम करत होते. आता शेती केल्यानंतर त्यांची वार्षिक उलाढाल दीड कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. त्यांची उत्पादने गुरुग्राम, नोएडा, पुणे, मुंबई आदी शहरांमध्ये पाठविली जात आहेत. राहुल ‘ श्रीराम ऑरगॅनिक फार्मर्स ग्रुप ’ ही कंपनी चालवतात, ज्यासोबत सहाशेहून अधिक शेतकरी जोडलेले आहेत. ते शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्यास प्रेरित करतात.

### शेती क्षेत्रातील कामगिरीबद्दल मिळाला पुरस्कार

शेती क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल राहुल यांना नवी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात ‘ मिलियनेअर फार्मर ऑफ इंडिया २०२४ ’ सारख्या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. २०२२ मध्ये त्यांना आग्रा येथे ऑरगॅनिक इंडिया पुरस्कार मिळाला आहे. २०२३ मध्ये त्यांना मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये सेंद्रिय शेती पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# राज्यातील सैनिकी शाळांच्या सुधारित धोरणाबाबत कार्यवाही सुरु!

## आर्मी स्कुलला राज्यस्तरीय समितीच्या विशेष पथकाची भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील सैनिकी शाळांचे सुधारित धोरण शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. या सुधारित धोरणात आवश्यक बदल करण्यासाठी स्वतंत्र राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी येथील विजयनाना पाटील आर्मी स्कुल अँड ज्यूनिअर कॉलेजला राज्यस्तरीय समितीच्या विशेष पथकाने भेट दिली.

छत्रपती संभाजीनगर येथील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र विभागीय मंडळाचे सहसंचालक अनिल साबळे, छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय उपसंचालक कार्यालयाचे सहाय्यक संचालक रवींद्र वाणी, समिती सदस्य विनायक वाघ, गटशिक्षणाधिकारी प्रमोद पाटील, विषयतज्ज्ञ प्रमोद पाटील, महेंद्र पाटील यांचा या विशेष पथकात समावेश होता. सुरुवातीला आर्मी स्कुलच्या छोट्या जवानांनी पथसंचालनाद्वारे मानवंदना दिली. यावेळी संस्थाध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांनी पथकाला शाळेच्या प्रगतीबाबत माहिती दिली. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील, प्रा. शाम पवार, प्रशांत गावंडे, संस्थेचे मानद शिक्षण संचालक प्रा. सुनील गरुड, प्राचार्य बी. डी. पाटील, पी. एम. कोळी, सुभेदार मेजर श्रीराम पाटील, नायब सुभेदार भटू पाटील, सुभेदार अनिल पाटील आदी उपस्थित होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी लष्करी प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यानंतर पथकाने वसतिगृहातील डॉक्टर कक्ष, स्वच्छतागृह तसेच मेस विभागाची पाहणी करून मेस मध्ये भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर त्यांनी शालेय इमारतीतील, मुख्य कार्यालय कक्ष, ग्रंथालय कक्ष, संगणक कक्ष, फिजिक्स लॅब, केमिस्ट्री लॅब, बायोलॉजी लॅब, इंग्लिश लैंग्वेज लॅबची पाहणी केली.

**शालेय प्रगतीबाबत समाधान!**

राज्यस्तरीय समिती पथकाने शाळेच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी अनिल साबळे व रवींद्र वाणी यांनी शालेय प्रगती बाबत समाधान व्यक्त केले. संगणक शिक्षक व्ही. डी. पाटील यांनी सैनिकी शाळेतील शिक्षकांना 'एनडीए' बाबत वर्षातून किमान एकदा विशेष प्रशिक्षण व कार्यशाळा देण्याबाबत अपेक्षा व्यक्त केल्या. उमेश काटे व एस ए बाविस्कर यांनी सैनिकी शाळेतील प्रवेश पूर्व परीक्षेत सुधारणा करून नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर प्रवेश पूर्व परीक्षा घेण्याबाबत सुचविले. या दोन्ही मागणीची पथकाने नोंद घेत शासनाकडे याबाबत अहवाल देणार असल्याचे संकेत दिले. प्रा. सुनील गरुड यांनी प्रास्ताविक केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य बी. डी. पाटील यांनी आभार मानले.



*अमळनेर : आर्मी स्कूलच्या भेटीप्रसंगी राज्यस्तरीय समितीचे अनिल साबळे, रवींद्र वाणी यांच्या समवेत माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, विनायक वाघ, प्रमोद पाटील आदी.*

# अमळनेरच्या विविध क्षेत्रातील रत्नांचा पत्रकारदिनी होणार गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या (मुंबई) अमळरेर शाखेतफे दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या कार्यकर्तृत्वाने जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी पत्रकार दिनानिमित्त आयोजित भव्य सांस्कृतिक सोहळ्यात या मान्यवरांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

यावर्षीच्या पुरस्कारांमध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश आहे. प्रमुख पुरस्कारार्थी आणि विभाग अमळनेर भूषण- माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील व ओमप्रकाश मुंदडा यांना या सर्वोच्च मानाच्या पुरस्काराने सन्मानित केले जाईल. शिक्षण व साहित्य- माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, भिकन पाटील यांना 'शिक्षण महर्षी', तर शिवाजीराव पाटील यांना 'साहित्य रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. आरोग्य सेवा : डॉ. जी. एम. पाटील (आरोग्य देवदूत) आणि डॉ. प्रशांतदादा शिंदे (आदर्श आरोग्य सेवा दूत) यांची निवड करण्यात आली आहे. सामाजिक व धर्मदाय कार्य : श्री मंगळ ग्रह मंदिर देवस्थानला 'आदर्श देवस्थान' म्हणून गौरवण्यात येईल. तसेच सौ. रिता बाविस्कर, किरण (कृष्णा) बहारे, प्रवीण पाटील आणि ज्ञानेश्वर धनगर यांना सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार दिले जातील. उद्योग व व्यवसाय- कैलास पाटील (उद्योगरत्न), प्रीतेश पारख, जितेंद्र गुंजाळ, रोनक संकलेचा आणि प्रेमकुमार शासनाणी यांना युवा उद्योजक म्हणून गौरवण्यात येईल. तसेच पारस गोल्ड यांना 'आदर्श सुवर्णकार' पुरस्कार प्रदान होईल. आदर्श सरपंच नितीन पाटील. युवा उद्योजक- विक्की जाधव, उत्कृष्ट अभियंता डिगंबर वाघ, आदर्श लोकसेवक- महेश पाटील, आदर्श शिक्षिका- अनिता सुरडकर, प्रशासन व पत्रकारिता पत्रकारितेतील प्रदीर्घ सेवेबद्दल पांडुरंग पाटील यांना 'जीवन गौरव' तर वृत्तपत्र वितरणासाठी एकनाथ सोनवणे यांचा सन्मान होईल. सिद्धांत सिसोदे (पोलीस), अजय शिवरामे (कर्मचारी) आणि वाहतूक पोलीस विभागाला उत्कृष्ट सेवेसाठी सन्मानित केले जाईल. कला व तांत्रिक क्षेत्रात गोविंद गायकवाड (गायक), रवींद्र भोई (कलाकार) यांचीही पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमातून समाजातील विविध घटकांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अमळनेर तालुकाध्यक्ष डॉ. समाधान मैराळे यांनी सोमवार, दि. २९ रोजी जाहिर केले आहेत. दरम्यान निवडीबद्दल पुरस्कारार्थींवर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## दिव्यांगांचे शुभ मंगल योजना
## थेट बँक खात्यात अडीच लाखांचा आहेर होणार जमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दिव्यांगांचे शुभ मंगल योजना म्हणजे महाराष्ट्र शासनाची दिव्यांग- अव्यंग विवाह प्रोत्साहन योजना आहे. जीचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी आर्थिक मदत देऊन सामाजिक समानता आणि सक्षमीकरण देणे आहे.

या योजनेंतर्गत दिव्यांग व्यक्तीने सामान्य व्यक्तीशी विवाह केल्यास दीड लाख रुपये आणि दुसऱ्या दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास अडीच लाख रुपये अनुदान दिले जाते. सदर अनुदान संबंधित पती- पत्नीच्या संयुक्त खात्यात जमा होते. मात्र, यासाठी विवाह नोंदणी आणि अर्ज करणे आवश्यक आहे.

**पात्रता व अटी**

विवाह करणाऱ्या दिव्यांग व्यक्तीचे अपंगत्व किमान ४० टक्के असावे. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. त्याला वैध यूडीआयडी कार्ड असणे आवश्यक आहे. विवाह नोंदणीकृत असावा. विवाहानंतर एक वर्षाच्या आत या योजनेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. अनुदानाची रक्कम पती- पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात जमा होते. त्यातील ५० टक्के रक्कम पाच वर्षांसाठी मुदत ठेव म्हणून ठेवली जाते.

**आवश्यक कागदपत्र**

विवाह नोंदणी दाखला. अपंगत्वाचे प्रमाणपत्र (यूडीआयडी कार्ड), अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड व मतदान कार्ड.

**अर्ज करण्याची प्रक्रिया**

विवाह झाल्यानंतर एक वर्षाच्या आत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.




## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234


### थंडीत अर्धांगवायू झाल्यास उडीद डाळीचा वापर ठरतो रामबाण

**अमळनेर :** हिवाळ्यात वातावरणातील गारव्यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. ज्यामुळे अर्धांगवायूचा धोका वाढू शकतो. उडीद डाळीचे महत्त्व आयुर्वेदानुसार 'रामबाण' काम करते.

**वातदोष कमी होतो :** उडीद डाळ उष्ण प्रकृतीची असल्याने शरीरातील 'वात' दोष संतुलित ठेवण्यास मदत करते.

**स्नायूंना मिळते बळकटी :** या डाळीमध्ये प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे कमकुवत झालेले स्नायू पुन्हा मजबूत होण्यास मदत होते.

**नसांच्या आरोग्यासाठी गुणकारी :** उडीद डाळीचे सेवन मज्जासंस्थेला उत्तेजित करते आणि रक्तभिसरण सुधारण्यास साहाय्य करते.

**असा करा वापर :** उडीद डाळीचे वरण, खिचडी किंवा गरम सूप दिल्यास शरीराला ऊब आणि ताकद मिळते.

**पचनाची घ्या काळजी :** उडीद डाळ पचायला जड असते, त्यामुळे ती शिजवताना हिंग, आले आणि लसणाचा वापर आवर्जून करावा.

## रेल्वेच्या शेवटच्या डब्यावर 'एक्स' हे अक्षर का लिहिलेले असते ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रेल्वे बाबतचे अनेक नियम सामान्यांना माहिती नसतात. असाच हा एक नियम फारच कमी लोकांना माहिती आहे. रेल्वेच्या शेवटच्या डब्यावर 'एक्स' हे अक्षर का लिहिलेले असते ते जाणून घेऊ या...

रेल्वेचा प्रवास हा सर्वाधिक सुरक्षित आणि सोईस्कर मानला जातो. आजही भारतातले कोट्यवधी लोक रेल्वेनेच प्रवास करणे पसंद करतात. विशेष म्हणजे रेल्वेने प्रवास करण्यासाठी तिकीट कमी असते. त्यामुळेच अनेकांना रेल्वेनेच प्रवास करायला आवडते. भारतीय रेल्वे विभागाने या प्रवाशांच्या सुरक्षेसाठी काही नियम बनविलेले आहेत. या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. एखाद्या नियमाचे उल्लंघन केल्यास मोठा अनर्थ घडण्याची शक्यता असते. त्यामुळेच रेल्वे विभागाचे आपले वेगळे काही नियम आहेत. रेल्वे विभागातर्फे रेल्वे सुरक्षितपणे धावावी यासाठी अनेक संकेतांचा वापर करते. याच सांकेतिक चिन्हांचा वापर करून रेल्वे प्रवासादरम्यान वेगवेगळे संदेश दिले जातात. असाच एक खास संदेश रेल्वेच्या शेवटच्या डब्यावर लिहिलेला असतो. रेल्वेच्या शेवटच्या डब्यावर इंग्रजी X हे अक्षर लिहिलेले असते. हे अक्षर रेल्वेच्या शेवटच्या डब्यावर तुम्हीही पाहिलेले असेल. आता या एक्स या अक्षराला रेल्वे विभागात फार महत्त्व आहे. हा एक्स अक्षराचा संदेश प्रवाशांसाठी नव्हे तर रेल्वे विभाग आणि रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी असतो. हे अक्षर दिसले म्हणजे रेल्वेने आपल्यासोबत सर्व डब्बे नेलेले आहेत. मागे एकही डब्बा शिल्लक राहिलेला नाही. म्हणजेच रेल्वे आपल्या सर्वच डब्यांना घेऊन सुरक्षितपणे प्रवास करत आहे, असा त्याचा अर्थ होता.



# पाकिस्तानमध्ये हजारो डॉक्टर्स, अभियंत्यांनी सोडला देश

### राजकीय अस्थिरता, आर्थिक संकटामुळे निर्णय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाकिस्तान सध्या सर्वात मोठ्या स्थलांतराचा सामना करत आहे. आर्थिक संकट आणि राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांत हजारो डॉक्टर, इंजिनिअर्स आणि अकाऊंटंटस्नी देश सोडला आहे.

नुकत्याच समोर आलेल्या सरकारी अहवालानुसार, गेल्या २४ महिन्यात पाकिस्तानने ५ हजार डॉक्टर, ११ हजार इंजिनिअर्स आणि १३ हजार अकाऊंटंटस् गमावले आहेत. या वास्तव परिस्थितीमुळे पाकिस्तानी जनता सरकार आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यावर टीका करत आहे. मुनीर यांनी नुकतेच या सामूहिक स्थलांतराचे समर्थन करताना त्याला 'ब्रेन गेन' म्हटले होते. मात्र, सरकारी आकडेवारी त्यांच्या या दाव्यातील फोलपणा उघड करत आहे.

**काय सांगतेय आकडेवारी?**

पाकिस्तानच्या ब्युरो ऑफ इमिग्रेशन अँड ओव्हरसीज एम्प्लॉयमेंटने प्रसिद्ध केलेली आकडेवारी चिंताजनक आहे.

असीम मुनीर यांची सोशल मीडियावर खिल्ली : ऑगस्ट महिन्यात अमेरिकेतील अनिवासी पाकिस्तानींना संबोधित करताना असीम मुनीर यांनी म्हटले होते, की परदेशात जाणारे लोक म्हणजे ब्रेन ड्रेन नसून तो पाकिस्तानसाठी ब्रेन गेन आहे. आता ही नवी आकडेवारी समोर आल्यावर नेटकऱ्यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले आहे.

**नेटकऱ्यांकडून मुनीर धारेवर**

एका वापरकर्त्याने मुनीर यांना मानसिक रुग्ण म्हणत टोमणा मारला. तर दुसऱ्याने म्हटले, की या लोकांचे अज्ञान देशाला विनाशाकडे घेऊन जात आहे. पीटीआय समर्थकांचे मत : इम्रान खान यांच्या पक्षाच्या समर्थकांनी म्हटले, की देशात उद्योग नाहीत, संशोधन निधी नाही आणि नोकऱ्याही नाहीत. विमानतळावर लोकांचा अपमान करून तुम्ही टॅलेंट थांबवू शकत नाही. त्यासाठी संधी निर्माण करावी लागते.


ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




## ना लोखंड, ना सिमेंट

# अयोध्येच्या श्रीराम मंदिरासाठी कोणते अत्याधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञान वापरले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अयोद्धेतील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिराच्या उद्घाटनाचा दुसरा वर्धापन दिन ३१ डिसेंबर रोजी (तिथीनुसार) साजरा होणार आहे. याविषयीची सविस्तर माहिती मंदिर व्यवस्थापनाने शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी दिली. 'प्रतिष्ठा द्वादशी' कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ३१ डिसेंबर रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह श्रीराम जन्मभूमी मंदिर संकुलातील अन्नपूर्णा मंदिरात ध्वजारोहण करतील. या समारंभात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही त्यांच्याबरोबर उपस्थित राहणार आहेत. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राशी संबंधित गोपाल यांनी सांगितले, की सांस्कृतिक कार्यक्रमांना २९ डिसेंबरपासून सुरूवात होईल आणि इतर धार्मिक कार्यक्रम २ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहतील.

प्रसिद्ध धर्मगुरू माध्वाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली पूजा-अर्चा आणि इतर धार्मिक विधी पार पडतील. देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक येण्याची अपेक्षा असल्याने त्यांच्यासाठी व्यापक व्यवस्था करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. त्याच पार्श्वभूमीवर गेली पाच वर्षे सुरू असलेल्या श्रीराम मंदिराच्या उभारणीचा घेतलेला हा आढावा.

### ध्वजारोहण समारंभात पंतप्रधान मोदींचा सहभाग

पुढील अनेक वर्षे सभोवतालचे वातावरण आणि नैसर्गिक आपत्ती यांना तोंड देऊ शकेल, असे मंदिर उभारण्यासाठी चार हजारांहून अधिक कामगार आणि कारागीर गेली पाच वर्षे झटत होते. या भव्य प्रकल्पामागे सीबीआरआय रुडकी, आयआयटी मद्रास, दिल्ली, मुंबई आणि गुवाहाटी तसेच भारतीय खगोलभौतिकी संस्था येथील अभियंते आणि तज्ज्ञांचे तांत्रिक पाठबळ होते. २५ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंदिरातील ध्वजारोहण समारंभात सहभाग घेतला होता. हा समारंभ मंदिराच्या बांधकाम पूर्णत्वाचे प्रतीक होता.

नृपेन्द्र मिश्रा यांनी सांगितले, की मुख्य मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून, सध्या परिसर सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. तसेच कुंपणाची भिंत आणि सभागृह (ऑडिटोरियम) यांची कामे २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रारंभी देणग्यांच्या स्वरूपात मिळालेल्या सुमारे तीन हजार कोटी रुपयांपैकी अठराशे कोटी रुपये मंदिराच्या बांधकामावर खर्च करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

### मंदिर संकुलाचा आढावा

- तीन मजली असलेले हे मंदिर १६१ फूट उंच, २३५ फूट रुंद आणि ३६० फूट लांब आहे.
- राजस्थानातील बंसी पहारपूर येथील स्टँडस्टोन वापरून मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. मंदिरात लोखंड किंवा पोलाद (स्टील) वापरण्यात आलेले नाही. गंज लागल्याने मंदिराचे आयुष्य कमी होते. त्यामुळे धातूचा वापर टाळण्यात आला आहे.
- माकडे आणि पक्षी मंदिरात येऊ नयेत म्हणून बसविण्यात आलेल्या जाळ्या सुद्धा टायटॅनियमपासून तयार करण्यात आल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकूण ३१ जाळ्या तयार करण्यासाठी हैदराबाद येथील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या मिश्रधातू निगम लिमिटेडकडून सुमारे १२.५ टन टायटॅनियम खरेदी करण्यात आले.




- मंदिराच्या तळमजल्यावर सुमारे १६० खांब आहेत. त्यांच्यावर विविध देवी-देवतांची कोरीव शिल्प कोरण्यात आली आहेत. याच मजल्यावर गर्भगृह आहे. २०२४ मध्ये झालेल्या पहिल्या प्राणप्रतिष्ठा समारंभानंतर, कृष्णशिला किंवा म्हैसूर काळ्या ग्रॅनाइटपासून घडवलेल्या रामलल्लाच्या (बालरामाच्या) मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. मंदिरातील एकूण ४७ दरवाज्यांपैकी १४ दरवाजे तळमजल्यावर असून, त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे.
- पहिल्या मजल्यावर श्रीराम दरबार आहे. येथे भगवान श्रीराम त्यांच्या राजारूपात, सीता, लक्ष्मण तसेच हनुमानजी यांच्या मूर्ती आहेत. या सर्व मूर्ती राजस्थानातील पांढऱ्या मकराणा संगमरवरी दगडातून घडविण्यात आल्या आहेत. या मजल्यावर १३२ खांब असून, प्रत्येक खांबावर सुबक कोरीव काम करण्यात आले आहे.
- पाचव्या शतकातील नागर स्थापत्याशैलीनुसार उभारलेल्या मुख्य मंदिर संकुलात गर्भगृहाव्यतिरिक्त पाच मंडप आहेत. हे मंडप म्हणजे नृत्य मंडप, रंग मंडप, गुह्य मंडप, कीर्तन मंडप आणि प्रार्थना मंडप मंदिरातील विविध सांस्कृतिक व धार्मिक विधींसाठी त्यांची रचना करण्यात आली आहे.
- मुख्य मंदिर संकुलाच्या बाहेर दुहेरी मजली परकोटा (बाह्य तटबंदी) आहे. ही तटबंदी सुमारे ७५० मीटर लांब आणि १४ फूट जाड आहे. तळमजल्यावर सूर्य, शिव, भगवती, गणेश, हनुमानजी आणि माता अन्नपूर्णा आदी विविध देवतांना समर्पित सहा मंदिरे आहेत. तसेच ट्रस्टची कार्यालयेही येथे आहेत. वरचा मजला परिक्रमा मार्ग म्हणून वापरला जातो. याशिवाय भगवान श्रीरामांच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या सात ऋषींचे सप्त मंदिरही आहे. या सात ऋषींमध्ये महर्षी वसिष्ठ, विश्वामित्र, वाल्मीकी, अगस्त्य, निषादराज, अहिल्या आणि माता शबरी यांचा समावेश आहे.

### आव्हाने

तज्ज्ञांच्या मते, मंदिराच्या बांधकामात वापरण्यात आलेल्या साहित्याचा आकार आणि प्रमाण लक्षात घेता ते साहित्य मिळविणे आणि त्याची हाताळणी करणे हे सर्वांत मोठे आव्हान होते. २०२० मध्ये पायाभरणीचे काम सुरू झाले तेव्हा वास्तुविशारद चंद्रकांत सोमपुरा यांनी दिलेल्या रचनेच्या आधारे किमान एक हजार वर्षे टिकेल अशा नमुन्यांवर आणि साहित्यावर आम्ही एकाच वेळी वैज्ञानिक अभ्यास सुरू केला. सहा महिन्यांच्या सखोल संशोधनानंतर आणि ५० हून अधिक संगणकीय मॉडेल्सवरील सिम्युलेशन्सनंतर अंतिम संरचनात्मक डिझाईनची शिफारस करण्यात आली, असे केंद्रीय इमारत संशोधन संस्था (सीबीआरआय) येथील वरिष्ठ शास्त्र
शास्त्रज्ञ डॉ. देबदत्त घोष यांनी सांगितले. उपलब्धता, कोरीव कामासाठी सुलभता आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या कारणांमुळे आम्ही बंसी पहारपूर वाळूच्या दगडाचा वापर करण्याचा निर्णय घेतला, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. घोष सध्या श्रीराम मंदिराच्या बांधकामातील अभियांत्रिकी पैलूंचे दस्तऐवजीकरण करत आहेत. सीबीआरआय आणि ट्रस्ट यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत हे दस्तऐवजीकरण अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास साहित्य म्हणून वापरले जाणार आहे. तज्ज्ञांच्या मते, मंदिराचा पाया घालण्यासाठी भूभौतिक आणि भू-अभियांत्रिकी अशा दोन्ही पातळ्यांवर सखोल संशोधन करणे आवश्यक होते. मंदिराचा पाया तब्बल १४ मीटर खोल असून, त्यामध्ये १.३२ लाख घनमीटर रोलर-कॉम्पॅक्टेड काँक्रीट भरले गेले आहे. त्याच्या वर स्थैर्यासाठी १.५ मीटर उंच, उच्च क्षमतेचा (हाय स्ट्रेंथ) राफ्ट तयार करण्यात आला आहे. त्यावर सुमारे २४,००० ग्रॅनाइट दगडांपासून बनविलेला ६.५ मीटर उंच चबुतरा उभारण्यात आला आहे.

तज्ज्ञांनी सांगितले, की उत्खननादरम्यान जमिनीत शरयू नदीच्या पाण्याचे अंश आढळल्याने ओलावा आणि संभाव्य पूरधोका यांपासून मुख्य रचना सुरक्षित ठेवण्यासाठी हा बहुस्तरीय पाय डिझाईन करण्यात आला.

### कोणते काम शिल्लक आहे?

२.७ एकर क्षेत्रात पसरलेले मुख्य मंदिर संकुल पूर्ण झाले आहे. संपूर्ण परिसर ७० एकरांचा आहे. त्यापैकी २० एकर क्षेत्र बांधकामासाठी वापरण्यात आले. ५० एकर मोकळे (ओपन टू स्काय) ठेवण्यात आले असून, सुमारे ३० एकर क्षेत्र हिरव्या पट्ट्यासाठी राखीव आहे. आता उरलेली कामे म्हणजे परिसराचे सुशोभीकरण, सुमारे ४ किलोमीटर लांबीची बाह्य परिघाभिंत आणि एक सभागृहाचे काम पूर्ण करणे.

मुख्य मंदिराचे बांधकाम आणि त्यासंबंधित सर्व कामे पूर्ण झाली आहेत. सध्या परिसराभोवती असलेल्या काटेरी तारांच्या कुंपणाऐवजी काँक्रीटची परिघाभिंत उभारणे बाकी आहे. या कामाचे कंत्राट उत्तर प्रदेश राजकीय निर्माण निगमला देण्यात आले आहे. या परिघाभिंतीलगत सभागृह उभारण्यात येणार आहे. ही कामेही २०२६ पर्यंत पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार लँडस्केपिंगमध्ये 'पंचवटी' विकसित करण्याचाही समावेश आहे. हे जंगल क्षेत्र माकडे, पक्षी, खार आणि इतर प्राण्यांसाठी राखीव असेल. मिश्रा यांनी सांगितले, की हे काम पाच वर्षांच्या करारांतर्गत जीएमआर समूहाला देण्यात आले असून, त्यांनी सामाजिक जबाबदारी म्हणून हे काम विनामूल्य करण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच हे एक सातत्याने चालणारे काम असून, ऋतूनुसार विविध प्रकारची झाडे आणि वनस्पती लावण्यात येणार आहेत.

# संतानप्राप्तीचा आणि धर्मपालनाचा पवित्र योग




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात एकादशी व्रताला अत्यंत महत्त्व आहे. प्रत्येक महिन्यातील शुक्ल व कृष्ण पक्षातील एकादशी भगवान विष्णूंना अर्पण केलेली असते. या एकादशांपैकी पुत्रदा एकादशी ही विशेष फलदायी मानली जाते. पुत्रप्राप्ती, संतानाचे आरोग्य आणि कुटुंबकल्याण यासाठी हे व्रत श्रद्धेने पाळले जाते.
पुत्रदा एकादशीचे महत्त्व

'पुत्रदा' म्हणजे पुत्र देणारी. ज्यांना संतान नाही किंवा ज्यांना संतानसुखाची कामना आहे, त्यांनी हे व्रत केल्यास भगवान विष्णू कृपा करतात, अशी धार्मिक मान्यता आहे. पौष महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला साजरी होणारी ही तिथी विशेष पुण्यदायी समजली जाते. धार्मिक ग्रंथांनुसार पुत्रदा एकादशीचे व्रत केल्याने
संतानप्राप्ती होते. संततीचे आयुष्य व आरोग्य उत्तम राहते. पापांचा क्षय होतो. कुटुंबात सुख-शांती नांदते.

### पौराणिक कथा

पुराणांमध्ये सांगितल्याप्रमाणे भद्रावती नगरीतील राजा सुकर्मा यांना अनेक वर्षे संतान नव्हते. राजाने व राणीने पुत्रदा एकादशीचे व्रत श्रद्धेने केले. भगवान विष्णूंच्या कृपेने त्यांना तेजस्वी पुत्रप्राप्ती झाली. तेव्हापासून हे व्रत संतानप्राप्तीसाठी विशेष प्रभावी मानले जाते.

### व्रतविधी

पुत्रदा एकादशीच्या दिवशी पहाटे स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. घरातील पूजास्थानी किंवा मंदिरात भगवान विष्णूंची पूजा करावी. तुळशीपत्र, फुले, फळे, पंचामृत अर्पण करावे. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करणे फलदायी मानले जाते. अनेक भाविक दिवसभर उपवास ठेवतात किंवा फलाहार करतात. रात्री विष्णुसहस्रनाम किंवा हरिपाठाचे पठण केले जाते.

### उपवासाचे नियम

या दिवशी तामसी भोजन टाळावे. शक्य असल्यास धान्य वर्ज्य करावे. व्रताच्या काळात सात्त्विक आचार, सत्य व संयम पाळणे आवश्यक मानले जाते. द्वादशीच्या दिवशी ब्राह्मणभोजन किंवा गरजूंना अन्नदान केल्यास व्रत पूर्ण होते.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या धावपळीच्या जीवनातही पुत्रदा एकादशी आपल्याला श्रद्धा, संयम आणि कुटुंबमूल्यांचे महत्त्व शिकवते. संतानप्राप्तीपेक्षा अधिक, हे व्रत पालकत्वाची जबाबदारी, संततीचे योग्य संस्कार आणि समाजातील नैतिक मूल्यांची जपणूक याची आठवण करून देते.

पुत्रदा एकादशी ही केवळ धार्मिक परंपरा नसून ती भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, आशा आणि सकारात्मकतेचे प्रतीक आहे. भक्तिभावाने आणि नियमांचे पालन करून हे व्रत केल्यास जीवनात सुख, समाधान आणि कुटुंबकल्याण लाभते, अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

# मन स्वाधीन होण्यासाठी मनापासून नाम घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगात आजपर्यंत पुष्कळ लोकांनी दानधर्म, स्वार्थत्याग केला. पण त्यांच्यामध्ये कर्तेपणाची जाणीव राहिल्याने खऱ्या अर्थाने त्यांना निःस्वार्थी बनता आले नाही. खरे म्हणजे आमचे मन आमच्या ताब्यात आल्याशिवाय आम्हाला निःस्वार्थी बनता येणार नाही. मन कोणत्या साधनाने आम्हाला आवरता येईल? योग, याग इत्यादी साधने त्यासाठीच सांगितली आहेत. पण ही साधने या काळात आम्हाला करता येण्यासारखी आहेत का? या साधनांसाठी लागणारी काळाची अनुकूलता आपण राहतो त्या परिस्थितीत आपल्याजवळ खास नाही. मन ताब्यात यायला सध्याच्या काळात नामस्मरणाशिवाय दुसरे साधनच नाही. कारण आज एक नामच भगवंताने अवताररूपाने आमच्यासाठी शिल्लक ठेवले आहे. तेव्हा मन स्वाधीन होण्यासाठी सर्वांनी मनापासून नाम घ्या. नाम घेताना मनाचे स्थैर्य बिघडविणारे जे विकार आहेत त्यांना आवरण्याचा प्रयत्न करा. मनाला सर्वांत मोठा विकार कोणता बाधत असेल तर तो म्हणजे अभिमान. अभिमानासारखा आपला घात करणारा दुसरा शत्रू कोणी नसेल. तो अभिमान सोडायला आपण शिकले पाहिजे. भगवंताने आजपर्यंत एवढे अवतार घेतले ते सर्व अभिमान मारण्यासाठीच होते. हिरण्यकश्यपूच्या वेळी भगवंताने अवतार घेतला; पण देव समोर उभे असतानासुद्धा त्याचा हात नमस्काराकडे न जाता तलवारीकडे गेला. यावरून त्याचा अभिमान किती तीव्र असेल, याची कल्पना येईल. तो अभिमान नाहीसा करण्यासाठी आपण कर्तेपणाची जाणीव सोडून नाम घेतले पाहिजे.

# हनुमानजींचा फोटो लावण्यासाठी कोणती दिशा शुभ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात सकारात्मक उर्जेचा वावर व्हावा, सुख-शांती नांदावी यासाठी घरात देव-देवतांचे फोटो लावले जातात.
यामागे अर्थातच श्रद्धेचाही भाग आहेच. पण या सगळ्या वास्तूचे काही नियम आहेत ते जाणून घेणे गरजेचे आहे.

असे म्हणतात, की घरात वास्तूनुसार देवी-देवतांचे फोटो लावले जातात. मूर्ती बसविल्या जातात. यामुळे पूजेचे फळ मिळते, अशी मान्यता आहे. पूजेच्या ठिकाणी वास्तुदोषांमुळे व्यक्तीला जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. तसेच घरात हनुमानजींची पूजा देखील अनेक लोक करतात. त्यामुळे हनुमानजींची मूर्ती कोणत्या दिशेला असावी, हे जाणून घेणे देखील गरजेचे आहे.

### हनुमानजींच्या मूर्तीशी संबंधित वास्तू



वास्तुशास्त्रानुसार हनुमानजींची मूर्ती किंवा फोटो घराच्या दक्षिण दिशेला ठेवावा. ही दिशा शुभ मानली जाते. या दिशेला फोटो लावताना हनुमानजींची बसलेल्या स्थितीत असावी. हे लक्षात घ्यावे. असे केल्याने घरातील सर्व नकारात्मक शक्ती दूर होतात. वास्तुशास्त्रानुसार बेडरूममध्ये हनुमानजींची मूर्ती ठेवणे शुभ नाही. यामुळे वास्तुदोष होऊ शकतो.

वास्तूच्या नियमांनुसार हनुमानजींच्या फोटोच्या स्वच्छतेची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. त्या फोटोची रोज पूजा करावी. तसेच मंगळवारी सुंदरकांड पाळावे. याशिवाय वाईट शक्तींपासून मुक्ती मिळविण्यासाठी घराच्या दक्षिण दिशेच्या भिंतीवर असलेल्या स्थितीत हनुमानजींचा लाल रंगाचा फोटो लावू शकता. वास्तुशास्त्रानुसार हनुमानजींचा फोटो किंवा मूर्ती जिन्याच्या खाली किंवा स्वयंपाकरात लावू नये.

वास्तुशास्त्राच्या नियमांनुसार शत्रू, घरगुती त्रास, नातेसंबंधातील कलह आणि कुटुंबातील नकारात्मकता टाळण्यासाठी पंचमुखी हनुमानजींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी.

असे म्हणतात, की मुख्य दरवाजावर पंचमुखी हनुमानजींचा फोटो लावल्याने घरातून नकारात्मक ऊर्जा दूर होते. घराच्या ड्रॉईंग रूममध्ये प्रभू श्रीरामचंद्र यांच्या दरबाराची मूर्ती तुम्ही बसवू शकता. तसेच या व्यतिरिक्त तुम्ही या खोलीत पंचमुखी हनुमानजी पर्वत उचलतानाचा फोटो देखील लावू शकता.

